आगच्छत् शिक्षार्थम्। निर्गच्छत् सेवार्थम्।

# महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा) औरंगाबाद

# School Leadership Academy, Maharashtra

## मोड्यूल क्र.३४

### ‘शाळेबाहेरची शाळा – माझी प्रयोगशाळा’ उपक्रमाच्या माध्यमातून शाळाबाह्य, अनियमित, हंगामी, स्थलांतरित कामगारांच्या मुलांना शाळेच्या प्रवाहात आणण्यासाठी केलेल्या कार्य पद्धतीचा अभ्यास

### A Study of Out of School irregular, Seasonal Migrant Worker's children in stream of schooling through My Laboratory initiative.

**प्रस्तावना :-**

नांदेड शहरापासून दक्षिणेला आठ किमी अंतरावर नांदेड – हैद्राबाद महामार्गावर गोदावरी नदीच्या काठावर विपुल प्रमाणात वीटभट्टी आहेत. दसरा दीपावली सणानंतर मोठ्या प्रमाणात वीटभट्टी कामगार, उसतोड कामगार यांचे जिल्हा, राज्य अंतर्गत स्थलांतर होत असते. नांदेड जिल्हा व शहर देखील याला अपवाद नाही. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक दृष्ट्या वंचित समुदायातील या स्थलांतरित कामगारांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न या कालावधीत ऐरणीवर येतो. नांदेड शहरालगत धनेगाव परिसरात जवळपास ५० ते ६० वीटभट्टी कारखाने आहेत. एका वीटभट्टीवर सरासरी ६ ते ७ कामगार कुटुंब काम करतात. त्यांच्या सोबत त्यांचे शाळेत जाणारे पाल्य देखील याच ठिकाणी वास्तव्यास असतात. बालरक्षक शिक्षिका श्रीमती उषा नळगिरे, डायट नांदेडचे अधिव्याख्याता आणि श्री अभय परिहार, श्री.बालाजी कानडखेडकर फिरते विषय शिक्षक, श्री माधव माधसवाड, डॉ.दादाराव शीरसाट, जिल्हा बालरक्षक समन्वयक, यांनी एकत्र येऊन शाळे बाहेरची शाळा, माझी प्रयोगशाळा या उपक्रमातून स्थलांतरित, अनियमित शाळा बाह्य विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचा मनोदय व्यक्त करून प्रत्यक्ष कामास सुरुवात केली.

**पार्श्वभूमी :-**

नोव्हेंबर 20, 1989 संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेत बाल अधिकार संहिता मान्य करण्यात आली. जगण्याचा, सहभागाचा, विकासाचा, संरक्षणाचा हक्क याद्वारे बालकांना मिळाला. देशा देशांमध्ये याला अनुसरून बाल हक्क आणि संरक्षणाचे विविध अधिनियम कायदे करण्यात आले. आपल्या भारत देशात 86 व्या घटना दुरुस्तीनुसार बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार 2009 कलम 21 ( अ )अन्वये करण्यात आला. शासन आणि स्थानिक प्राधिकरण यांनी

शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देणे आणि पालकांनी आपल्या पाल्यांना शाळेत दाखल करणे ही संविधानात्मक जबाबदारी दोन्ही घटकावर आली. शिक्षणाच्या सुविधेमध्ये वाढ होत असताना देखील सामाजिक,आर्थिक, भौगोलिक, सांस्कृतिक, कौटुंबिक, शैक्षणिक इत्यादी कारणास्तव भारतात प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणामध्ये मुलांच्या गळतीचे प्रमाण लक्षणीय आहे. असे असताना सुद्धा परिस्थितीशी हार न मानता शासन, स्थानिक प्राधिकरण आणि समाज यांच्याकडून बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या अधिकाराचे संरक्षण होण्याच्या दृष्टीने विविध प्रयत्न केले जात असल्याचे दिसून येते. महाराष्ट्र राज्यात करण्यात आलेल्या प्रयत्नांचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे मांडता येईल.

**शाळाबाह्य मुलांना शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी महाराष्ट्रात केलेल्या प्रयत्नांचा आढावा :-**

**सर्व मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे विशेषतः शाळाबाह्य अनियमित स्थलांतरित बालकामगार मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी करण्यात आलेल्या राज्यस्तरीय प्रयत्नांचा आढावा पुढील प्रमाणे -**

राज्यस्तरावरून मार्च 2021 व त्यापूर्वी देखील वेळोवेळी शाळाबाह्य बालकांसाठी सर्वेक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. परंतु कोरोना महामारीमुळे पुनश्च शाळाबाह्य स्थलांतरणबाबतचा धोका लक्षात आल्याने "मिशन झिरो ड्रॉप आऊट" या शासन निर्णयाद्वारे दिनांक ५ जुलै ते 20 जुलै 2022 या कालावधीत व्यापक स्वरूपात शाळाबाह्य मुलांची शोध मोहिम राबविण्यात आली. यामध्ये महसूल, ग्रामविकास, नगर विकास, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, महिला व बालविकास, कामगार विभाग, आदिवासी विकास, अल्पसंख्यांक विकास विभाग, सार्वजनिक आरोग्य, गृह विभाग तसेच सेवाभावी संस्थेचा देखील सहभाग घेण्यात आला. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे यांच्या समता विभागाद्वारे शाळाबाह्य व नियमित हंगामी स्थलांतरित बालकांसाठी वयानुरूप समकक्ष वर्गातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी शिक्षक मार्गदर्शक पुस्तिका,विद्यार्थी मित्र पुस्तिका निर्मिती आणि शिक्षकांसाठी वेळोवेळी प्रशिक्षणे आयोजित करण्यात येतात. राज्यभरातून स्वयंप्रेरणेने शाळाबाह्य मुलांसाठी विशेष प्रयत्न करू इच्छिणाऱ्या शिक्षकांची बालरक्षक चळवळ व्यापक प्रमाणात सुरू आहे. या बालरक्षक शिक्षकांना प्रशिक्षण व ओळखपत्र देण्यात आली आहेत. एक गाव, एक बालरक्षक याची अंमलबजावणी राज्यात सुरू आहे.

**शाळाबाह्य, अनियमित, हंगामी स्थलांतरित बालकांसाठीच्या शासनाच्या काही विशेष योजना :-**

वेळोवेळी सर्वेक्षणाचे आयोजन, हंगामी वसतिगृह, शिक्षण हमी कार्ड, उपस्थितीची नोंदणी, बालरक्षक, सरल प्रणाली, शगुन पोर्टलवर यशोगाथा यामध्ये केस स्टडीज,व्हिडिओज,टेस्टीमोनियल्स इत्यादी बाबींचे दस्तऐवजीकरण या बाबी शाळाबाह्य, अनियमित,हंगामी स्थलांतरित बालकांसाठी  शासन स्तरावरून केल्या जात आहेत.

**सदर उपक्रम हाती घेतल्यानंतर प्रत्यक्ष कामात सुरुवात झाली तेव्हा खालील प्रकारच्या समस्या दिसून आल्या :-**

एखाद्या ध्येयाच्या साध्यतेसाठी मार्गक्रमण करत त्यामध्ये उद्भवणाऱ्या संभाव्य धोके समस्यांचा पूर्व अंदाज मांडणी करणे क्रमप्राप्त आहे. शाळेबाहेरची शाळा - माझी प्रयोगशाळा सुरू करत असताना पूर्व अनुमानित संभाव्य अडचणी यांची खालील प्रमाणे यादी करण्यात आली. :-

1. धनेगाव परिसरात शाळेसाठीची जागा व वर्गखोलीची उपलब्धता.
2. सर्वेक्षणासाठी लागणारे मनुष्यबळ
3. पालकांचा विश्वास व मानसिकता तयार करणे.
4. विद्यार्थ्यांनी नियमित शाळेत येणे आणि टिकवून ठेवण्याचे आव्हान.
5. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण करण्याचे आव्हान.
6. प्रचलित शिक्षण पद्धतीपेक्षा वेगळया पद्धतीने शिकण्याच्या पद्धतीसाठी संसाधनाची उपलब्धता करण्याचे आव्हान.
7. स्वयंप्रेरित, उपक्रमशील आणि सामाजिक बांधिलकी असणाऱ्या विविध कलागुणांनी युक्त सक्षम शिक्षकाची मदत उपलब्ध करून घेण्याचे आव्हान.
8. विद्यार्थ्यांना कृतीयुक्त,जीवनानुभवातून, खेळ आधारित, सहयोगातून, स्वयंशिक्षणातून शिकते करण्याचे आव्हान.

**मोड्युल अध्ययनाची उद्दिष्टे -**

शाळाबाह्य, अनियमित, स्थलांतरित, बालकामगार मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे, टिकवून ठेवणे, गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या शिफारशीनुसार मॉडेल स्कूल प्रस्तुत करणे या हेतूने चालविण्यात येणाऱ्या “शाळेबाहेरची शाळा माझी प्रयोगशाळा“ या उपक्रमाच्या माध्यमातून मोड्यूलची उद्दिष्टे खालील प्रमाणे निश्चित करण्यात आली :-

1.“शाळेबाहेरची शाळा माझी प्रयोगशाळा'' ही अनियमित स्थलांतरीत बालकामगार मुलांच्या शाळेची संकल्पना समजून घेणे.
2.शाळाबाह्य, अनियमित, स्थलांतरित, बालकामगार मुलांना नियमित शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी . “ शाळेबाहेरची शाळा माझी प्रयोगशाळा “ मध्ये केलेले प्रयत्न समजून घेणे.
3.“शाळेबाहेरची शाळा माझी प्रयोगशाळा “यातील कार्यपद्धतीचा अभ्यास करणे.
4. शाळाबाह्य, अनियमित, स्थलांतरित, बालकामगार मुले शिकू शकतात हा दृष्टीकोन विकसित करणे.

हंगामी स्थलांतरित वीटभट्टी कामगारांच्या मुलांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण करणे, त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणून गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासोबतच राष्ट्रीय शैक्षणिक 2020,च्या अनुषंगाने एकविसाव्या शतकातील शैक्षणिक कौशल्य, नाविन्यपूर्ण अध्यापनशास्त्राचे मॉडेल विकसित करण्यासाठी शाळेबाहेरची शाळा - माझी प्रयोगशाळा ही सुरू करण्यात आली.

# यशोगाथा :- शाळेबाहेरची शाळा - माझी प्रयोगशाळा :-



सकाळ नांदेड
नांदेड, मंगळवार, १४ फेब्रुवारी २०२३
TODAY

SakalNews
@SakalMediaNews
www.esakal.com

**सुखासन**
आपण लहान मुले, किशोरवयीन मुले यांच्यासाठी उपयुक्त असलेल्या योगासन, प्राणायाम याबद्दल आजपासून जाणून घेणार आहोत. २

**उन्हाळी तीळासह इतर निविष्ठाचे वाटप**
नांदेड : भारतीय कृषी अनुसंधान परिषद नवी दिल्ली आणि जेएनआयई एसटीआर नांदेड संचलित कृषी विज्ञान केंद्र पोखर्णीच्या वतीने नांदेड जिल्ह्यातील अतिशय दुर्गम व डोंगराळ भागात वसलेल्या लांजी आणि पडसा (ता. माहूर) येथील शेतकऱ्यांना उन्हाळी तीळ व इतर निविष्ठांचे वाटप करण्यात आले. ३

## दोन शिक्षकांचा पुढाकार; चिंचेच्या झाडाखाली बसून विद्यार्थी घेताहेत शिक्षणाचे धडे

# शाळाबाह्य मुलांसाठी बिनभिंतीची शाळा

**नांदेड, ता. १३ (बातमीदार) : बालरक्षक शिक्षकांनी आपली शालेय जबाबदारी सांभाळून कर्तव्यनिष्ठेने ही जबाबदारी पूर्ण केली, हा जिल्हा परिषदेच्या शाळेतील शिक्षकांचा एका अर्थाने गौरवच आहे. याउपरही जी काही थोडीबहुत मुले शिक्षणाच्या प्रवाहाबाहेर राहिली त्यांच्यासाठी इतर शिक्षक स्वयंप्रेरणेने शासनाच्या या उदात्त धोरणामुळे पुढे झाली. वाजेगाव येथील अनिकेत कांबळे सारखी अनेक मुले शिक्षण घेणारी ही विटभट्टी परिसरातील बिनभिंतीची शाळा याचे एक आदर्श उदाहरण म्हणून नावारूपास आले आहे.**

नांदेडच्या दक्षिणेकडे वाजेगाव परिसर अशा अनेक अनिकेतला घेऊन उभा आहे. वाजेगाव आता नांदेड शहराचाच एक भाग झाला आहे. गोदावरी नदीच्या एका काठाला वाजेगाव तर दुसऱ्या काठाला धनेगावचा परिसर सुरू होतो. ज्यांना शेती नाही, स्वयंरोजगाराची इतर साधने नाहीत असे जिल्ह्यातील काही कुटुंब या काठावर येऊन विटभट्टी उद्योगामुळे रोजगारासाठी स्थिरावले आहेत. परंतु यातून अनेक प्रश्न निर्माण झालेत. यात सर्वात महत्वाचा व नाजूक प्रश्न होता तो म्हणजे इथल्या विस्थापित कुटुंबातील मुलांच्या शालेय शिक्षणाचा. मुलांचे शाळेत प्रवेश तर होते, परंतु शाळा मात्र कित्येक मैल दूर असलेल्या त्यांच्या गावात होती.

मात्र, या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी तसेच बिनभिंतीच्या शाळेला आकार देण्याण्यासाठी डायट सारखी शैक्षणिक संस्थेतील प्रा. अभय परिहार, अर्धापूर येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षिका उषा नळगिरे या पुढे आल्या. आपली सर्व सर्व कर्तव्ये सांभाळून शनिवार व रविवार असे दोन दिवस त्या या शाळेसाठी देतात.

**कशी आहे बिनभिंतीची शाळा**

- ध्यानाची अनुभूती घेता यावी, यासाठी एका झाडाच्या आडोशाला मोठा दगड ठेवला आहे.
- मुले एक - एक करून जमेल तसे आपले चित्त एकवटून इथे बसण्याचा प्रयत्न करतात.
- वनस्पती व प्राण्यांची ओळख करून देणारा एक कोपरा जंगल क्लब म्हणून साकारला आहे.
- एक कोपरा समाजशास्त्रासाठी आहे.
- आरोग्यासाठी स्वच्छतेचा कोपरा इथला सजलेला आहे.
- भट्टीची कामे आटोपून मुले या चिंचेच्या झाडाखालच्या शाळेला येतात.
- विटांच्या राशी ज्या पद्धतीने मोजल्या जातात त्या पद्धतीने त्यांना गणित शिकविले जाते.
- चिखल विटांना आकार देतो तो चिखल आणि कोरडी माती इथे आता अक्षरांना आकार द्यायला लागली आहे.

**शाळेत नाव असूनही जाता येत नाही**

- मुळचा उमरखेड येथील असलेला अनिकेत कांबळे सांगतो की, माझे उमरखेडला शाळेत नाव आहे. परंतु, वडील वाजेगावला तात्पुरते स्थलांतरीत झाले आहेत. गावी कुणी नसल्याने वडिलांसोबत येवून त्यांना वीटभट्टीवर मदत करतो. असे अनेक अनिकेत येथे असून, त्यांनी चिखल आणि विटांच्या राशी जवळ केल्या आहेत.

नांदेड : वाजेगाव परिसरातील विट भट्ट्यांवरील शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी अभय परिहा उषा नळगीरे हे दर शनिवारी आणि रविवारी परिसरातील चिंचेच्या झाडाखाली बिनभिंतीची शाळा भरवून अध्यापन करत आहेत.

"मुलांनी या बिनभिंतीच्या शाळेत रमावे यासाठी सारे काही येथे साकारले आहे. चिंचेच्या झाडाखाली भरणाऱ्या या शाळेत झोक्यापासून ते रोप क्लायंबिंग पर्यंत, आरोग्याच्या शिक्षणासाठी स्वच्छ हात धुण्यासाठी कॅनमधील पाणी गुरूत्वाकर्षणाच्या सहाय्याने काढून हँडवॉशपर्यंत असलेले प्रयोग विज्ञानाच्या प्रत्यक्ष साक्षात्काराचे द्योतक आहेत.
- **विनोद रापतवार**, जिल्हा माहिती अधिकारी, नांदेड.

**चिखल,दगड आणि विटांच्या राशीतील बिनभिंतीची शाळा : -**

अवघ्या बारा वर्षांचा अनिकेत कांबळे हा आपल्या भोवतालचे वास्तव व त्याच्या शैक्षणिक गरजांविषयी जे काही सांगत होता त्यावर कोणाचाही विश्वास बसणार नाही 'मी सकाळी ४ वाजता उठतो. फडाचे काम झाल्यावर गंडे लावतो चिखल टाकून झाल्यावर फड लावतो. वडिलांना चिखल टाकू लागतो. नंतर साळ आणायला जातो मग भट्टीसाठी लागणारा काळा भुसा आणतो. नंतर वडिलांसोबत ट्रेकटर मधून माती आणायला जातो, त्यानंतर जेवण करतो.' अनिकेतचे कुटुंब उमरखेडहून वाजे गावला तात्पुरते स्थलांतरित झाले आहे. गावी कोणी नसल्यामुळे आणि शाळा मूळ गावी असल्याने त्याला वडिलांसोबत राहण्याशिवाय पर्याय नाही. अनिकेत सारखी अशी अनेक मुले आपली शाळा सोडून कामाच्या ठिकाणी स्थलांतरित झाली आहेत. विटाचे गणित दंड्याच्या माध्यमातून तो ज्या सफाईदारपणे सांगत होता तसे एखाद्या स्थापत्यशास्त्र पदवी प्राप्त झालेल्या अभियंत्यालाही सांगणे अवघड ठरेल. विटांसाठी लागणारी माती व तयार झालेली वीट विटांचा आकार भाजलेल्या विटांची पारख यापासून ते भट्टीला द्यावी लागणारी उष्णता माती चिखलाचे विटासंबंधीचे त्याचे असलेले ज्ञान ऐकून कोणीही आश्चर्य चकित होईल. स्वानुभव आणि प्रत्यक्ष कृती यातून जे ज्ञान मिळते. ते किती पक्के असते याची प्रचीती अनिकेतच्या प्रत्येक वाक्यात जाणवत होती. शिक्षण का सोडले असा प्रश्न जेव्हा त्याला विचारला तेव्हा विटांसाठी कालवलेल्या चिखलाकडे पाहत धैर्याने त्याने उत्तर दिले. 'मला शिकावे वाटते पण वडिलांना कामासाठी मदत आवश्यक आहे. नाहीतर काम पूर्ण व्हायला खूप वेळ लागतो. अश्या प्रकारे गरज महत्वाची असल्याने शिक्षण बाजूला पडले.

नांदेडच्या दक्षिणेकडे वसलेला वाजेगाव परिसर अशा अनेक अनिकेतला घेऊन उभा आहे. गोदावरी नदीच्या एका काठाला वाजेगाव तर दुसऱ्या काठाला धनेगावचा परिसर सुरू होतो. वाजेगाव आता नांदेड शहराचाच एक भाग झाला आहे. नांदेड जिल्ह्यातील काही कुटूंब या काठावर रोजगारासाठी स्थिरावले आहेत.

स्वयंरोजगाराची इतर साधने नाहीत, ज्यांना शेती नाही असे यात विस्थापित स्थलांतरीत कुटुंबांनी या उद्योगाचा आधार घेतला. येथील अनेक विटभट्टी उद्योगामुळे काही कुटुंबांच्या रोजगाराचा प्रश्न वीट उद्योगामुळे निश्चितपणे सुटला मात्र यात सर्वात महत्वाचा नाजूक प्रश्न मुलांचे शिक्षण,ज्यात काही प्रश्न निर्माण झाले . काही कुटूंब इतर ठिकाणाहून येथे येऊन स्थिरावले त्यांच्या मुलांच्या शालेय शिक्षणाचा प्रश्न हा प्राधान्याने विचार करावयास लावणारा आहे. मुलांचे शाळेत प्रवेश तर होते परंतू शाळा मात्र कित्येक मैल दूर असलेल्या त्यांच्या मूळ गावात होती . म्हणूनच बालरक्षक टीमने या बिनभिंतीच्या शाळेला आकार देण्याचे ठरविले.त्यातूनच विटभट्टीच्या फडाशेजारी बिनभिंतीची शाळा साकारली. याचबरोबर डायट आणि शिक्षण विभागातील कार्यरत बालरक्षक टीमने आपली सामाजिक जबाबदारी आहे हे समजून या मुलांच्या शिक्ण्यासाठीचे नियोजन केले .


सामाजिक उत्तरदायीत्त्वाच्या जबाबदारीतून एक नागरिक म्हणून आपले काही तरी योगदान असले पाहिजे या कृतज्ञतेतून पुढे होणाऱ्या महिला शिक्षिका म्हणजे उषा नळगीरे येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षिका आहेत.तिथली सर्व कर्तव्य सांभाळून शनिवार व रविवार वेळ देतात,तसेच या उपक्रमाला डायट येथील अधिव्याख्याता अभय परिहार आपली कार्यालयीन कर्तव्ये सांभाळून जमेल तसा जास्तीत जास्त वेळ या शाळेसाठी देतात जणू मुलांच्या शिकण्याची जबाबदारी त्यांनी घेतली आहे .

मुलांनी या बिनभिंतीच्या शाळेत रमावे यासाठी जास्तीत जास्त शिकण्याची प्रक्रिया सोपी व्हावी यासाठी व्यवस्था केली आहे. चिंचेच्या झाडाखाली भरणाऱ्या या शाळेत झोक्या पासून ते रोप क्लायंबिंग पर्यंत व्यवस्था केली आहे. आरोग्य शिक्षणासाठी – स्वच्छ हात धुण्यासाठी पिपामधील पाणी पंपाने ओढून घेण्याची व्यवस्था केली आहे. ध्यानाची अनुभूती घेता यावी यासाठी एका झाडाच्या आडोश्याला दगड ठेवून ध्यान धारणेची सोय केली आहे. शिवाय वनस्पती व प्राण्यांची ओळख करून देणारा एका कोपरा जंगलात तयार केला आहे. भट्टीची कामे आटोपून मुले या चिंचेच्या झाडाखालच्या शाळेत येतात. या मुलांना शिकण्याची गोडी लागावी या उद्देशाने काही समाजसेवी व्यक्तींनी दिलेले साहित्य मुले बाहेर काढतात चटई अंथरून शाळा सुरु होते. त्रिशा, प्रभावती, रेश्मा, नयन, पायल, अर्चना अश्या पंधरा मुली व बावीस मुले असे एकूण सदोतीस मुले शिक्षण घेत आहेत. वीटभट्टीच्या शेजारीच ही शाळा तयार झाली असल्याने अक्षरे आणि जोडाक्षरे शिकवण्यासाठी परातीत रांगोळी टाकून रेघोट्याच्या सरावातून अक्षरे आणि शब्द शिकण्याचे काम मुले करत आहेत. तसेच आजूबाजूला मिळणारे साहित्य वापरून शिकण्याचा प्रयन्त सुरु आहे.

**कार्यपद्धती -**

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क या शालाबाह्य, अनियमित, स्थलांतरित, बालकामगार मुलांच्या बाबतीत आपण जपला पाहिजे, त्याचे संवर्धन केले पाहिजे या एक विचाराने प्रेरित होऊन कृतिशील बालरक्षक अधिकारी

व शिक्षक ( समता विभाग ) यांनी एकत्रित येऊन बदलाव हम लायेंगे ग्रुप (BHL Group) असे स्वतःसाठी प्रेरणादायी ब्रीद वाक्य निर्धारित करून दिनांक 01 नोव्हेंबर 2022 पासून प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली.




**ध्येय साध्यतेच्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल व यश प्राप्तीचे टप्पे :-**

**1.सर्वेक्षणाची पहिली सभा प्रत्यक्ष वीटभट्टीवर :-**

वीटभट्टी कामगारांच्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी आलेला विचार इतरांसोबत चर्चा करण्यासाठी कृतिशील बालरक्षक शिक्षक आणि गटसाधन केंद्र नांदेड येथील सर्व विषय साधन व्यक्ती समावेशित विषय तज्ञ फिरते विशेष शिक्षक यांची पहिली सभा दिनांक 02 नोव्हेंबर 2022 रोजी प्रत्यक्ष धनेगाव वीटभट्टी वर घेण्यात आली. यामध्ये वीटभट्टी कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी सर्वेक्षण करणे, त्यांना नजीकच्या शाळेत प्रवेशित करणे यासोबतच या मुलांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण करण्यासाठी स्वयंशिक्षणाची आंतरिक प्रेरणा निर्माण करण्यासाठी याच परिसरात नियमित शाळेच्या व्यतिरिक्त सायंकाळी 4.00 ते 5.30 वेळेत शाळा सुरू करण्याचा मनोदय बालरक्षक टीमने व्यक्त केला.



शाळेबाहेरची शाळा - माझी प्रयोगशाळा अंतर्गत विविध कृती उपक्रम

**2. प्रत्यक्ष सर्वेक्षण ( दिनांक 03 ते 05 नोव्हेंबर 2022 ) :-**

गट साधन केंद्र नांदेड येथील सर्व विषय साधन व्यक्ती समावेशित विषय तज्ञ फिरते विशेष शिक्षक यांनी महिला व पुरुषांचे दोन गट करून सामूहिकरीत्या तीन दिवसात जवळपास 30 ते 40 एकर परिसरात पसरलेल्या वीटभट्ट्यात काम करणाऱ्या कुटुंबांचे सर्वेक्षण केले.

**3. शाळाबाह्य स्थलांतरित एकूण 78 विद्यार्थ्यांचा शोध :-**

या तीन दिवसात वय वर्ष 3 ते 18 वयोगटातील एकूण 18 शालाबाह्य अनियमित स्थलांतरित विद्यार्थ्यांचा शोध या गटाला लागला.

**4.सर्वेक्षणा दरम्यान पालकांचे उद्बोधन, समुपदेशन आणि प्रसिद्धी :-**

सर्वेक्षण करत असताना पालकांना आपल्या पाल्यांना नियमित शाळेत पाठविण्याबाबतचे समुपदेशन आणि विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी, स्वयंशिक्षणाची पद्धत विकसित होण्यासाठी शाळेबाहेरची शाळा - माझी प्रयोगशाळा यामध्ये शाळेच्या व्यतिरिक्त वर्ग घेण्याची व्यवस्था करण्यात आली असल्याची प्रसिद्धी करण्यात आली.

**5.वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन :-**

शिक्षणाधिकारी प्राथमिक डॉ. सविता बिरगे नेहमीच आमच्या कार्याला प्रेरणा व मार्गदर्शन करत असतात. वीटभट्टी कामगारांच्या मुलांसाठीच्या शाळेबाबतची कल्पना टीमने बोलून दाखविल्याबरोबर कौतुकाची थाप देऊन मी आपल्या पाठीशी आहे आणि शाळेच्या औपचारिक शुभारंभ प्रसंगी येण्याचे आमंत्रण स्वीकारून टीममध्ये आत्मविश्वास वृद्धिंगत केला.

**6.शाळेसाठीची जागा निश्चिती :-**

विविध वीटभट्टी कारखानदारांशी संपर्क साधल्यानंतर त्यांच्या अपुऱ्या जागेच्या समस्येला समजून घेऊन सरते शेवटी श्री. बाळगीर पंचमगीर गिर ( रावसाहेब महाराज ), माजी जिल्हा परिषद सदस्य यांच्याशी वीट भट्टी कामगारांच्या मुलांसाठी शाळा सुरू करण्याचा मनोदय आणि त्यासाठी आपल्या शेतातील जागा देण्याची विनंती केली असता तात्काळ विलंब न करता त्यांनी होकार दिला. निसर्गाच्या सानिध्यात खोलीची व्यवस्था असलेली विशाल चिंचेचे झाड, पाण्यासाठी हात पंपाची व्यवस्था स्वतःच्या ट्रॅक्टरने जागेची स्वच्छता व सपाटीकरण इत्यादी बाबत विनामूल्य सेवा श्री. बाळगीर पंचमगीर गिर यांनी उपलब्ध करून दिली. यामध्ये गटसाधन केंद्र नांदेड येथील विषय साधन व्यक्ती, समावेशित विषय तज्ञ, फिरते विशेष शिक्षक यांनी देखील सक्रिय सहभाग घेतला.

https://youtube.com/shorts/UjtJD0DbKmY?feature=share

**7.शाळा शुभारंभाची प्रसिद्धी :-**

दिनांक 10 नोव्हेंबर 2022 रोजी फिरते ध्वनिक्षेपक घेऊन वीटभट्टी परिसरात पुनश्च एकदा शाळेबाहेरची शाळा - माझी प्रयोगशाळा चा शुभारंभ दिनांक, ठिकाण आणि आपल्या पाल्यांना पाठविण्याबाबतचे आवाहन टीम मार्फत करण्यात आले.

https://youtube.com/shorts/1b4CqMV2Sbw?feature=share

**8.शाळेचा शुभारंभ :-**

राष्ट्रीय शिक्षण दिनाचे औचित्य साधून दिनांक 11 नोव्हेंबर 2022 रोजी वीटभट्टी कामगारांच्या मुलांसाठीची शाळेचा शुभारंभ करण्यात आला. तसेच डायट प्राचार्य श्रीमती जयश्री आठवले, डॉ सविता बिरगे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), डायट संस्थेतील ज्येष्ठ अधिव्याख्याता, अधिव्याख्याता, श्री. बाळगीर पंचमगीर गिर, प्रथम संस्थेचे सदस्य यांच्या उपस्थितीत शाळेचा औपचारिक शुभारंभ सोहळा दिनांक 15 नोव्हेंबर 2022 रोजी थाटात संपन्न झाला.




शाळेबाहेरची शाळा - माझी प्रयोगशाळा अंतर्गत विविध कृती/उपक्रम



शाळेबाहेरची शाळा - माझी प्रयोगशाळा अंतर्गत विविध कृती/उपक्रम

अ) विद्यार्थ्यांनी निपुण भारत अभियान अंतर्गत भाषेमध्ये मूलभूत साक्षरता आणि इयत्तानिहाय संपादणूक क्षमता वृद्धिंगतेसाठी  स्वतःची आवड, गती, क्षमता यानुसार शिकते होणे आणि सहअध्यायी गट सहयोगिता एकमेकांना मदत करून शिकणे या आधुनिक नाविन्यपूर्ण अध्यापन शास्त्रानुसार अध्ययन पद्धतीचा अवलंब करून अध्ययन प्रसंग निर्मिती करण्यात आली आहे. मुलांच्या शिक्षण प्रक्रियेच्या काही व्हिडिओ लिंक्स

1. https://youtu.be/kBdIDxW2PhY
2. https://youtu.be/fAr8cCETrxc

ब) प्रथम संस्थेकडून ग्राम शिक्षा केंद्र अंतर्गतचे वाचन साहित्य उपलब्ध करून देण्यात आले. शालेय इमारत वर्गखोली नसलेल्या प्राचीन काळातील गुरुकुल प्रणालीप्रमाणे विद्यार्थी एका झाडाला वाचन वृक्ष म्हणून संबोधून त्या ठिकाणी वाचन साहित्य स्वतः निवड करून वाचन करतात. Learn to Read ऐवजी Read to Learn शिकण्याची प्रक्रिया सुरू आहे.  विद्यार्थ्यांच्या वाचन कृतीच्या व्हिडिओ लिंक्स

1. https://youtu.be/kwaTalzJ1HE

क) Gross Motor Skill Development :- विद्यार्थ्यांची हाताची बोटे, स्नायू, नेत्र समन्वय यासाठी धूळपाटी आणि एकंदरीत शारीरिक क्षमता वृद्धी साठी शारीरिक  हालचालीच्या विविध कृतींचे संयोजन करण्यात आले आहे.

1. https://youtu.be/MBhRO1s8dYM

ड) वर्गीकरण क्षमता :- विद्यार्थ्यांमध्ये वयोगटांनुसार वर्गीकरण क्षमता वृद्धिंगत होण्यासाठी अध्ययन साहित्याच्या माध्यमातून प्रसंगांची निर्मिती करण्यात आली आहे.

1. https://youtube.com/shorts/21hGlAwbyf4?feature=share

इ) अध्ययन साहित्य प्रसंग निर्मिती प्रत्यक्ष विद्यार्थी सहभाग :- विद्यार्थ्यांच्या भाषिक व गणितीय क्षमता वृद्धिंगतेसाठी अध्ययन प्रसंगांसाठी आवश्यक असणाऱ्या अध्ययन साहित्याच्या निर्मितीमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग घेण्यात येत आहे. या सहभागामुळे विद्यार्थ्यांना नवनिर्मितीचा आनंद गटात एकत्रित काम करण्याचे मूल्य सामाजिककरण इत्यादी गुण अप्रत्यक्षरीत्या संस्कारीत होत आहेत. उदाहरणादाखल अध्ययन अनुभव प्रसंग साहित्य निर्मिती :-

1. https://youtu.be/SRQQfJeHOFU

ई) जीवनानुभवातून गणितीय कौशल्य वृद्धी :- वीट भट्टी कामगारांची मुले दैनंदिन जीवनात पालकांना फळ तयार करणे गंडे रचने विटा उठाई करणे इत्यादी कामात मदत करतात. याच जीवन अनुभवांचा उपयोग करून एखाद्या उद्योग

व्यवसायाला आधारभूत म्हणून गणितीय कौशल्याच्या विकासासाठी वीट व इतर संसाधनाच्या वापरातून अध्ययन अनुभवांतून विद्यार्थ्यांची शिकण्याची प्रक्रिया होत आहे.

1. https://youtube.com/shorts/Gd9CRU9MzgU?feature=share
2. https://youtu.be/zgnXtE-pK8Y
3. https://youtu.be/sZnr9AtYtvc

उ) गणितीय कौशल्य आत्मसात करण्याचे ELPS तंत्र : E - Experience, L - Language, P - Picture, S - Symbol  गणितीय कौशल्य आत्मसात करताना विद्यार्थ्यांच्या क्रियाशील मेंदूसाठी विविध नाविन्यपूर्ण गणितीय खेळाचे आयोजन करण्यात आले आहे.

1. https://youtu.be/d3Cua11BC3E

ऊ) पारंपारिक अध्यापनापेक्षा विद्यार्थी स्वतः गटात शिकणे : दिनविशेष साजरे करत असताना विषयांतर्गत बंदिस्त अध्ययन क्षमता निष्पत्ती नसून एकात्मिक पद्धतीनुसार एकाच अध्ययन प्रसंगातून नानाविध अध्ययन क्षमता निष्पत्ती वृद्धिंगत करता येतात याचे दिग्दर्शन करण्यासाठी ऑलिंपिक पदक विजेत्यांचे जन्मदिवस साजरा करत असताना त्यातून मोजमापाचे एकक देखील विद्यार्थ्यांनी आत्मसात करावेत म्हणून त्याप्रमाणे अध्ययन प्रसंगाची निर्मिती करून एकमेकांच्या साह्याने विद्यार्थ्यांच्या शिकण्याची प्रक्रिया होत आहे.

1. https://youtu.be/pCZEywXha3Q
2. https://youtu.be/0Gf6lhJumFA

ए) शालेय इमारत वर्गखोली नसलेल्या बिन भिंतीच्या या निसर्ग शाळेत School As Learning Aid जंगल सफारी करून प्रत्यक्ष  जीवनानुभवातून विद्यार्थ्यांना वनस्पती व प्राणी जीवनाचे अनुभव दिले जात आहेत.

https://youtu.be/qlwtCW9v9tg

ऐ) अभ्यासक्रम पूरक अभ्यासक्रमेत्तर उपक्रमांचे आयोजन : विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उच्च जीवनमूल्य संस्कार असलेला स्वहितापेक्षा राष्ट्रहिताला प्राधान्य देणारा सुजाण सुशिक्षित नागरिक निर्मितीसाठी विविध अभ्यासक्रम पूरक अभ्यासक्रमेत्तर उपक्रमांचे संयोजन दिनविशेषानुसार करण्यात येत आहेत.

1. https://youtube.com/shorts/YLewVCEPNdY?feature=share
2. https://youtu.be/LnUMi67usKs
3. https://youtu.be/e-KvggNLIwE

**ओ)** दप्तराविना शनिवार – वीटभट्टी कामगारांच्या मुलांसाठीची शाळा यात दर शनिवारी दप्तराविना शनिवार उपक्रमाअंतर्गत (Learning to Learn) शिकण्यासाठीच्या विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांचे संयोजन केले जाते. विद्यार्थ्यांना संख्याबोध बेरीज व गुणाकार क्रिया स्वतः करण्यासोबतच Gross Motor Skills Development साठी चोकलेट आणि प्लेटचा वापर करून नाविन्यपूर्ण खेळ घेण्यात येतो. Art Integrated Learning मधून विद्यार्थ्यांनी पाना फुलांचा वापर करून विविध कलाकृती तयार केल्या. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या कलाकृतींचे प्रदर्शन करण्यासाठी शाळेला प्रदर्शन फलकाची आवश्यकता होती. West is Best, Zero Budget नुसार प्रदर्शन फलकासाठी रेफ्रीजरेटर कव्हरचे रिकामे बॉक्स भिंतीला लावण्यात आले व त्यालाच माझा कला प्रदर्शन फलक असे नाव देण्यात आले. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या आपापल्या कला कृती प्रदर्शित करून विद्यार्थ्यांनी आनंद घेतला. गोष्टींचा शनिवार अंतर्गत सामुहिक श्रवणातून विद्यार्थी प्रश्न उत्तरांच्या रुपात चर्चा करतात.

1. https://youtu.be/qOOZ6daDxJU **( लिंबू चमचा शर्यत )**
2. https://youtu.be/_4U_96DskQ0 **( नाटयीकरण )**
3. https://youtube.com/shorts/ywBAKEQFdIE?feature=share **( स्वयंशासन दिन )**
4. https://youtu.be/mwjtM7uBcEc **( परेड )**



**शाळेबाहेरची शाळा - माझी प्रयोगशाळा अंतर्गत विविद्य कृती उपक्रम**

**उपक्रमाची फलनिष्पत्ती :-**

**अ) विद्यार्थ्यांच्या संपादणूक पातळीत वाढ :-**


राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या शिफारसीनुसार अभ्यासक्रम, अध्ययन पद्धती, मूल्यमापन इत्यादी बाबत नाविन्यपूर्ण अध्यापनशास्त्रानुसार शिक्षण प्रक्रिया, शिक्षण पद्धतीचा वेगळा विचार करून विद्यार्थ्यांना शिकते केले असता विद्यार्थ्यांच्या संपादणूक क्षमता वृद्धी अहवाल :-

# संपादणूक क्षमता वृद्धी अहवाल

## त्रयस्थ संस्था मूल्यमापन पडताळणी ( प्रथम )

## पूर्व व उत्तर चाचणी अहवाल : भाषा

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | पूर्व चाचणी | | | | | उत्तर चाचणी | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रारंभिक | अक्षर | शब्द | परिच्छेद | गोष्ट | प्रारंभिक | अक्षर | शब्द | परिच्छेद | गोष्ट |
| 1. | संकेत अनिल इंगळे | 1 | | | | | 1 | | | | |
| 2. | पायल संभाजी बुचडे | 1 | | | | | 1 | | | | |
| 3. | प्रभावती बालाजी सूर्यवंशी | 1 | | | | | | 1 | | | |
| 4. | अर्चना संभाजी बुचडे | 1 | | | | | 1 | | | | |
| 5. | रेश्मा रोहिदास गादेवार | 1 | | | | | | 1 | | | |
| 6. | प्रेम चांदू डोम्पले | | 1 | | | | | | 1 | | |
| 7. | शिवम खंडू कांबळे | | | 1 | | | | 1 | | | |
| 8. | अश्विन अशोक वाघमारे | | 1 | | | | | | 1 | | |
| 9. | त्रिशा रामराव वाघमारे | 1 | | | | | | 1 | | | |
| 10 | अरुण अशोक वाघमारे | | | 1 | | | | | | 1 | |
| 11 | विकास प्रकाश बलखंडे | | | | | | | 1 | | | |
| 12 | विकास देविदास तेलंग | | | | | | | | | | 1 |
| 13 | नैतिक माधव घोडजकर | | | | | | | | | 1 | |
| 14 | निकिता पंडित गवाले | | | | | | | 1 | | | |
| 15 | ईश्वर विठ्ठल कांबळे | | | | | | | | | 1 | |



संपादणूक क्षमता वृध्दी अहवाल

त्रयस्थ संस्था मूल्यमापन पडताळा (प्रथम)


पूर्व व उत्तर चाचणी : गणित


| अ.क्र. | विद्यार्थ्यांची नावे | पूर्व - चाचणी | | | | | | | | | उत्तर चाचणी | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रारंभिक | संख्या 1-9 | संख्या 10-99 | बेरीज | वजाबाकी | शाब्दिक उदा. | बोनस (a) | बोनस (b) | बोनस (c) | प्रारंभिक | संख्या 1-9 | संख्या 10-99 | बेरीज | वजाबाकी | शाब्दिक उदा. | बोनस (a) | बोनस (b) | बोनस (c) |
| 01 | संकेत अनिल डंगर्ने | | 1 | | | | | | | | 1 | | | | | | | | |
| 02 | पायल संभाजी कुचडे | 1 | | | | | | | | | 1 | | | | | | | | |
| 03 | प्रभावती बा. सूर्यवंशी | 1 | | | | | | | | | | 1 | | | | | | | |
| 04 | अर्चना संभाजी कुचडे | 1 | | | | | | | | | 1 | | | | | | | | |
| 05 | रेशमा रो. गादेवार | | 1 | | | | | | | | | 1 | | | | | | | |
| 06 | प्रेम चांद डोम्पाले | | | 1 | | | | | | | | | | | | 1 | | | 1 |
| 07 | शिवम खंडू कांबळे | | 1 | | | | | | | | | 1 | | | | | | | |
| 08 | आश्विन अशोक वाघमारे | | 1 | | | | | | | | | 1 | | | | | | | |
| 09 | त्रिशा रामराव वाघमारे | 1 | | | | | | | | | 1 | | | | | 1 | | | 1 |
| 10 | अरुणा अशोक वाघमारे | | | 1 | | | | | | | | 1 | | | | | | | |
| 11 | विकास प्रकाश खलखंडे | | | | | | | | | | | | | | | 1 | | | 1 |
| 12 | विकास रोहिदास तेलंग | | | | | | | | | | | | 1 | | | | | | |
| 13 | नैतिक मा. चोंडगकर | | | | | | | | | | | 1 | | | | | | | |
| 14 | निकीता पंडित गवाले | | | | | | | | | | | | | | | 1 | | | 1 |
| 15 | ईश्वर विठ्ठल कांबळे | | | | | | | | | | | | | | | | | | |

त्रयस्थ संस्था प्रथम कडून करण्यात आलेल्या मूल्यमापन पडताळयाचे विश्लेषण :-

| Language Levels | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | Beginner | Letter | Word | Para | Story | Total |
| Baseline | 6 | 2 | 2 | 0 | 0 | 10 |
| Endline | 4 | 3 | 3 | 0 | 0 | 10 |

| Math Levels | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | Beginner | NK 0-9 | NK 10-99 | Addition | Subtraction | WP | Total |
| Baseline | 4 | 4 | 2 | 0 | 0 | 0 | 10 |
| Endline | 4 | 4 | 0 | 0 | 0 | 2 | 10 |



**संपादणूक पडताळयाचे वर्णनात्मक विश्लेषण / निष्कर्ष :-**

**भाषा :**

1. प्रारंभिक स्तरावरील ६० टक्के विद्यार्थ्यांची उच्चस्तर संपादणूक अक्षर, शब्द. परिच्छेद याबाबत पातळी २० टक्क्यांनी वाढली.

**गणित :**

1. विद्यार्थ्यांमध्ये शाब्दिक उदाहरणे सोडविण्याची क्षमता विकसित झाली.
2. प्रारंभिक स्तरावरील विद्यार्थीची संख्या ज्ञान 1 ते 9 किंवा 10 ते 99 या स्तरावर प्रगती झाली.

**ब ) आधुनिक अध्ययन पद्धतीचे डेमो / दिग्दर्शन पाठ :-**

नाविन्यपूर्ण अध्यापनशास्त्र याला अनुलक्षून हावर्ड गार्डनरच्या बुद्धिमत्ता सिद्धांतानुसार विद्यार्थ्यांना शिकते करण्याच्या विविध आधुनिक ज्ञानरचनावादी अध्ययन पद्धतीचे डेमो / दिग्दर्शन पाठ तंत्रज्ञानात्मक संसाधने युट्युब फेसबुक इंस्टाग्राम इत्यादी द्वारे शिक्षकांसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

क ) You Tube Channel :-

विद्यार्थ्यांना शिकते करण्यासाठी अध्ययन प्रसंगाची निर्मिती करणे, पाठ्यपुस्तकाच्या बाहेर जाऊन प्रत्यक्ष जीवनानुभवातून ज्ञान संपादन करणे, ERAC व ELPS तंत्राचा वापर, शारीरिक विकास, स्वच्छता व आरोग्य, स्तर निहाय अध्ययन, गटकार्य, सहयोगिता, एकमेकांना मदत सहअध्यायी, विषय मित्र, Learning to Learn, निपुण भारत मिशन अंतर्गत पायाभूत साक्षरता व अंकज्ञान लक्ष्य साध्यतेसाठी शिक्षकांना उपयुक्त ठरतील असे कमीत कमी 30 सेकंद ते जास्तीत जास्त 2 मिनिट 30 सेकंदाचे शैक्षणिक व्हिडिओ You Tube Channel च्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या मोड्युलमध्येच प्रसंगानुरूप मुद्द्याला अनुसरून यूट्यूब व्हिडिओ लिंक्स देण्यात आल्या आहेत.

**ड ) राष्ट्रीय पुरस्कार :-**

आरोग्य मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या वतीने आयोजित स्कूल हेल्थ प्रोग्राम दोन दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेत महाराष्ट्र राज्याला एनिमिया वॉरियर्स ( Out of School ) पुरस्काराने आरोग्य मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडून गौरविण्यात आले आहे.




**इ ) शॉर्ट फिल्मची निर्मिती :-**

शिक्षण क्षेत्रातील भागधारक, विद्यार्थी, शिक्षक, पालक, नागरिक व समाजाचे उद्बोधन आणि शिक्षण मंत्रालय, भारत सरकार,नवी दिल्ली यांच्या वतीने राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद व केंद्रीय शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था ( CIET ), नवी दिल्ली यांच्याकडून आयोजित केल्या जाणाऱ्या ई- कन्टेन्ट निर्मिती स्पर्धेसाठी शॉर्ट फिल्म 'बदल -THE CHANGE' ची निर्मिती करण्यात आली असून या शॉर्ट फिल्म ला देखील राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाला आहे.

पोटाची खळगी भरण्यासाठी हंगामी
स्थलांतराच्या विळख्यात असलेले कुटुंब..
उदरनिर्वाहाचे साधन नसल्यामुळे कोसोदूर भटकंती करत भाकरीच्या
चंद्राच्या शोधात विटभट्टीवर काम करण्यासाठी हंगामी स्थलांतरीत
कुटुंब...
वीटभट्टी कामगारांच्या मुलांसाठीची शाळा : शाळेबाहेरची शाळा -
माझी प्रयोगशाळा
ह्या उपक्रमाला ध्यानात ठेऊन एक छोटासा प्रामाणिक प्रयत्न
लघुचित्रपटातून करण्याचा प्रयत्न केला..
आणी त्याचेच कौतुक म्हणून
***NCERT AICEeCC***
***AWARD 2023***
(राष्ट्रीय पुरस्कार)
भेटला....
प्रवास लांबचा आहे
पण तयार आहोत...
🙋‍♂️😎
सर्व टीम चे **अभिनंदन** व मनस्वी धन्यवाद ❤️💐
संतोष केंद्रे सर 🤝
अभय परिहार सर 🤝
श्याम कापसे सर 🤝




**शालेय नेतृत्वाच्या अनुषंगाने मोड्यूलची उपयुक्तता :-**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या शिफारशीनुसार अभ्यासक्रम, अध्ययन पद्धती, मूल्यमापन इत्यादी बाबत नाविन्यपूर्ण अध्यापनशास्त्रानुसार विद्यार्थ्यांच्या शिकण्याची प्रक्रिया, विद्यार्थ्यांना शिकते करण्याची पद्धती, संपूर्ण वर्ग अध्ययन, गट अध्ययन, सह अध्यायी अध्ययन, विषय मित्र, सहभागीता, आवड, क्षमता, गती इत्यादीचा विचार करून स्वयं शिक्षण, कृतीयुक्त, आनंददायी, पृच्छा, प्रकल्प, ERAC, ELPS तंत्र, शारीरिक हालचाल, पाठ्यपुस्तकाबाहेरील अनुभव, नाट्यविष्कार अशा नानाविध पद्धतीने सुलभकांनी अध्ययन प्रसंगांची निर्मिती केली तर खऱ्या अर्थाने ज्ञानाची निर्मिती होईल. पाठांतर करून स्मरणशक्तीची चाचणी घेण्यापेक्षा विद्यार्थ्यांची शिकण्याची प्रक्रिया कशी घडून आली आणि विद्यार्थ्यांमध्ये क्षमता संवर्धन होऊन उच्च जीवनमूल्य संस्कारीत स्वतः आत्मनिर्भर होऊन देश आत्मनिर्भर करण्यामध्ये त्याचे योगदानाची दखल घेतली जाईल असे शाळेचा प्रमुख या नात्याने मुख्याध्यापक आणि वर्गाचा प्रमुख

म्हणून वर्ग शिक्षक, विषय शिक्षक यांनी या मोड्यूलमधून अभ्यासावे आणि याची अंमलबजावणी करावी यासाठीच हा अट्टाहास.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या शिफारशीनुसार मोड्यूलची उपयुक्तता :-**

**शाळेबाहेरची शाळा - माझी प्रयोगशाळेतील विद्यार्थ्यांची शिकण्याची प्रक्रिया -**

अनौपचारिक सहज पद्धतीने विद्यार्थी शिकते व्हावेत यासाठी नाविन्यपूर्ण अध्यापनशास्त्र, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मधील अभ्यासक्रमाचा आकृतीबंध, निपुण भारत, शिकण्याच्या वेगळया पद्धतीचा विचार केलेल्या देशातील व जगातील नामवंत शाळेच्या कार्यपद्धतीचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करून आणि 21 व्या शतकातील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी राज्यातील वर्गांमधून विद्यार्थ्यांची शिकण्याची प्रक्रिया घडवून आणत असताना शिक्षकांनी सुलभक म्हणून अध्ययन प्रसंगाची निर्मिती करण्याबाबतचे दिग्दर्शन करण्याच्या उद्देशाने शाळेबाहेरची शाळा माझी प्रयोगशाळेचे स्वरूप यामध्ये पुढील प्रमाणे रचना करण्यात आली आहे. :- मी इथे का येतो ? मी इथे आल्यानंतर माझ्यात कोणते बदल दिसतील ? माझ्या शिकण्याच्या पद्धती, वाचन वृक्ष, खेळणी आधारित शिक्षण, समाजशास्त्र ( माझ्यापासून ते जगापर्यंतचा अभ्यास ), शारीरिक विकास खेळ व गणित, वीटभट्टी उद्योगातून प्रत्यक्ष व्यावहारीक गणितीय क्रिया, शास्त्र व आरोग्य, स्वच्छता हँड वॉश स्टेशन, सेल्फी पॉईंट, ध्यान करण्याची जागा ( माझी आवड, निवड ते करिअर ), मी आज कोणाला कोणती मदत केली ( आठवा, सांगा, लिहा ), मी आज काय शिकलो ? इत्यादी मुद्द्यांना धरून शाळेबाहेरची शाळा माझी प्रयोगशाळा येथे तयारी करण्यात आली. निश्चितच शिक्षणाचे ध्येय खऱ्या जीवन मूल्यांची रुजवणूक करून देशाच्या प्रगतीमध्ये प्रत्येकाचे योगदान असेल असा सुशिक्षित नागरिक घडविण्याचे कार्य आपल्या सर्वांच्या सहकार्यातून होईल असा विश्वास आहे.

**समारोप :-**

शिक्षणाचा अधिकार कायदा - 2009 आणि बाल हक्क व सुरक्षितता यासाठी शिक्षण क्षेत्रातील एक भागधारक व संवेदनशील नागरिक म्हणून आपल्या कर्तव्याचे वहन करत असताना शाळाबाह्य, अनियमित, हंगामी स्थलांतरित कामगारांच्या मुलांचे शिक्षण, बालमजुरी व बालविवाह प्रतिबंध इत्यादीसाठी आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -2020 च्या अभ्यासक्रम, अध्ययन पद्धती, मूल्यांकन याबाबतच्या शिफारशीनुसार सर्वच मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळण्यासाठी सदर मॉड्यूलमध्ये राबविण्यात आलेल्या शाळेबाहेरची शाळा - माझी प्रयोगशाळेतील अध्ययन प्रसंगानुरुप विद्यार्थ्यांना शिकते केले तर निपुण भारत मिशन अंतर्गतचे पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान आणि इयत्ता निहाय क्षमता, अध्ययन निष्पत्ती, NAS, SLAS,PISA यामध्ये विद्यार्थ्यांची कामगिरी उंचावलेली दिसेल असा सार्थ विश्वास वाटतो.













शाळेबाहेरची शाळा माही प्रयोगशाळा

**संदर्भ साहित्य :-**


1. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -2020 ड्राफ्ट
2. शिक्षणाचा अधिकार कायदा -2009
3. शिक्षक पर्व कार्यक्रम - 2022.
4. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई. दिनांक 22 जून 2015 : प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र.
5. समता विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे : शिक्षक मार्गदर्शक पुस्तिका व विद्यार्थी मित्र पुस्तिका
6. शालेय नेतृत्व विकास कार्यक्रम पूरक वाचन साहित्य, जानेवारी 2018 : संचालक, महाराष्ट्र विद्या प्राधिकरण,पुणे.



| **मोड्यूल विकसक** | **समन्वयन** | **मार्गदर्शक** |
|---|---|---|
| श्री अभय परिहार | डॉज्योती कुलकर्णी. | श्रीरमाकांत काठमोरे. |
| अधिव्याख्याता | समन्वयक | संचालक |
| जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था | महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व | महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व |
| नांदेड | प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद | प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद |